महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट नं.जी-९, प्रो.अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१
email : gmdc@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २६४७५९९५
फॅक्स क्रमांक : ०२२ - २६५८०६४२

क्र.मासं/रवका/न.क्र.२ब/ 30346

दिनांक : ~~०३/१०/२०११~~ 04/10/2011

प्रति
प्रादेशिक कार्यकारी संचालक-३,
म.रा.वि.वि.कं.मर्यादित,
विद्युत भवन, तळ मजला, काटोल रोड,
**नागपूर - ४४० ०१३.**

विषय : मुंबई हिंदी विद्यापिठाची साहित्य सुधाकर (बी.ए.हिंदीस्तर) ही परीक्षा बी.ए.समकक्ष गृहीत धरून नियुक्ती न देणेबाबत.

संदर्भ : पत्र क्र. कास-२/नाग/साप्रवि/गोप/२४४, दिनांक ०४/०८/२०११.

.....

उपरोक्त विषयास अनुसरून, आपले पत्र क्र.कासं-३/नाग/साप्रवि/गोप/२४४दि.०४.०८.२०११ अन्वये मुंबई हिंदी विद्यापिठाची साहित्य सुधाकर (बी.ए.हिंदीस्तर) ही परीक्षा उत्तीर्ण केलेल्या अवलंबितांना विद्युत वितरण कंपनीमध्ये निम्नस्तर लिपिक/कार्यालय सहायक या पदावर नियुक्तीसाठी पात्र समजावे किंवा कसे याबाबत मार्गदर्शन मागितले आहे.

२. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये काही पदांवर सरळसेवा प्रवेशाद्वारे नियुक्तीकरिता मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी अशी शैक्षणिक अर्हता निर्धारित करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने निर्णय क्र.१०९९/१३४/मशि-४, दि.१४.०६.१९९९, पुरकपत्र क्र.१०९९/१३४/मशि-१, दि.०५.०४.२००३ आणि क्र.समक-२००७/(२६/०७)/मशि-६, दि.२८.०२.२००७, अन्वये काही विद्यापीठे, मानिव विद्यापीठे, ऐच्छिक मान्य शैक्षणिक संस्था यांनी प्रदान केलेल्या पदव्या/पदविकांना काही अटींच्या अधीन राहून केंद्रिय किंवा राज्य विधी मंडळांचे अधिनियमांद्वारे स्थापित विद्यापिठांनी प्रदान केलेल्या पदवी/पदविकांबरोबर काही अटींवर समकक्षता देण्याचा निर्णय घेतला आहे. असे पदवी/पदवीकाधारक शासनातील दुय्यम शाळातील हिंदी शिक्षकांच्या जागेवर हिंदी शिक्षक म्हणून तसेच राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये/विद्यापिठांमध्ये फक्त संस्कृत शिक्षक म्हणून नियुक्त करण्यासाठी पात्र धरण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई हिंदी विद्यापिठ, मुंबई ही संस्था केंद्र किंवा राज्य शासन यांच्या अधिनियमांद्वारे स्थापित विद्यापिठ नसून विद्यापिठ अनुदान आयोगाने मान्य केलेल्या विद्यापिठांच्या यादीत या संस्थेचे नाव नाही.

३. सबब, महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय क्र.समक-१०९९/१३४/मशि-४ दि.१४.०६.१९९९, पुरकपत्र क्र.१०९९/१३४/मशि-१, दि.०५.०४.२००३ आणि क्र.समक-२००७/(२६/०७)/मशि-६, दि.२८.०२.२००७ अन्वये मान्यता दिलेल्या समकक्ष पदव्या/पदविका तसेच मुंबई हिंदी विद्यापिठ, मुंबई या संस्थेद्वारे प्रदान करण्यात आलेल्या साहित्य सुधाकर परीक्षा बी.ए.(हिंदीस्तर) या पदवीधारकांना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमधील पदांसाठी नियुक्तीसाठी तसेच पदोन्नतीसाठीही ग्राह्य धरण्यात येऊ नये असा खुलासा करण्यात येत आहे.

*महाव्यवस्थापक (मासं)*

प्रतिलिपी :-

१) प्रेषण यादीप्रमाणे विभागीय कार्यालय स्तरापर्यंत
२) प्रेषण यादीप्रमाणे मुख्य कार्यालयातील व्यवस्थापक (मासं) स्तरापर्यंत.

*D:\O&M\F.N.2-B.doc*
*03/10/2011*